# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पू.)

जि. ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, • E-mail Id : tp@mbmc.gov.in


लोकसेवा हक्क कायदा
Right to Public Service Act
आपली सेवा आमचे कर्तव्य

O.C. (Legal) 2022-01

जा.क्र :- मनपा/नर/ 386/2022 - 2023 दिनांक :- 2e/8/2022

**// भाग भोगवटा दाखला //**

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय
भाईंदर.

प्रति,

1) **मे. मॅक्रोटेक डेव्हलपर्स लिमिटेड (विकासक)**
**412, 4 ला मजला, 17 जी, वर्धमान चेंबर्स,**
**हर्निमन सर्क, कावासाजी पटेल रोड, फोर्ट, मुंबई - 400 001.**

2) **श्री. प्रदिप कांबळे (वास्तुविशारद)**
**बी-101, पहीला मजला, रामनगर, डोंबिवली (पूर्व)**

विषय - **मौजे घोडबंदर, स.क्र. 90/2पै., 90/3ब, 91/1क, 91/2, 98/2 या जागेतील इमारत प्रकार 1,2,3,4 (तळ + 23 मजले), क्लब हाउस (तळ + 1) मजलेसाठी As built भोगवटा दाखला व MLCP इमारत (तळ + 8) करीता As built भाग भोगवटा दाखला मिळणेबाबत.**

संदर्भ - 1) वास्तुविशारद मे. प्रदिप कांबळे ॲण्ड असो., यांचा दि. 09/02/2022, दि.29/08/2022 व दि.28/04/2022 रोजीचा प्रस्ताव.

2) मा. जिल्हाधिकारी कार्यालयाचे क्र.महसुल/क-1/टे-2/घोडबंदर-ठाणे/सनद/एसआर-53/2020 दि.23/08/2021 अन्वयेचे सनद आदेश.

3) मे. सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र. यु.एल.सी./टिए/डब्ल्यु.एस.एच.एस.-20/एसआर-1110, दि.21/10/2000 चे आदेश व पत्र क्र.युएलसी/टिए/एटीपी/कलम-20/एसआर-1110/199/2021 दि.23/03/2021 अन्वये अंतिम नाहरकत दाखला.

3) मिरा भाईंदर महानगरपालिकेकडील पत्र क्र.मनपा/नर/830/2019-20 दि.28/05/2019 व मनपा/नर/4300/2020-21 दि. 31/03/2021अन्वये सुधारीत नकाशे मंजुरीसह सुधारीत बांधकाम परवानगी.

4) मिरा भाईंदर महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/1462/2018-19 दि.20/06/2018 अन्वये जोत्याचा दाखला.

5) मे. वास्तुविशारद मे. प्रदिप कांबळे ॲण्ड असो., यांनी (Building Completion Certificate) दि.08/02/2022 रोजीचा इमारत पुर्णत्वाचा दाखला.

6) गोकानी कन्सलटंटट (श्री. वत्सल गोकाणी) यांचेकडील इमारतीचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असलेबाबतचा दि.28/02/2022 रोजीचा दाखला.

7) मे. सफायर कंनस्ट्रक्शन कंपनी इंजिनियर ॲण्ड कॉन्ट्रक्टर यांचा दि.28/02/2022 रोजीचा प्लबींगबाबतचा दाखला.

Kriti

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पू.)
जि. ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, • E-mail Id : tp@mbmc.gov.in


O.C. (Legal) 2022-01

जा.क्र :- मनपा/नर/ 386/2022 - 2023 दिनांक :- 29/8/2022

8) साईट सुपरवायझर, श्री. संदिप टी. काकड यांनी जागेवरील इमारतीचे काम योग्यरितीने झाल्याबाबतचा दि.08/02/2022 रोजीचा दाखला.

9) महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडील पत्र क्र.मनपा/अग्नि/1707/2021-22 दि.04/02/2022 अन्वये अंतिम नाहरकत दाखला.

10) महानगरपालिकेच्या मा. कार्यकारी अभियंता (साबां) यांनी पत्र क्र. मनपा/विद्युत/ 3814/2021-22 दि.02/02/2022 अन्वये सोलार वॉटर हिटींग सिस्टीम कार्यान्वीत असल्याबाबतचा दाखला

11) महानगरपालिकेच्या मा. कार्यकारी अभियंता (साबां) यांनी पत्र क्र. मनपा/साबां/एस.डब्लू.डि-32/6896/2021-22 दि.02/02/2022 अन्वये स्टॉर्म वॉटर ड्रेन कार्यान्वीत असल्याबाबतचा नाहरकत दाखला

12) महानगरपालिकेच्या मा. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी पत्र क्र. मनपा/पापू/2500/2021-22 दि.20/01/2022 अन्वये रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम कार्यान्वीत केल्याबाबतचा दाखला

13) महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाकडील पत्र क्र. मनपा/वृपा/658/2021-22 दि.24/03/2022 अन्वये नाहरकत दाखला.

14) महानगरपालिकेच्या मा. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी पत्र क्र. मनपा/पापू/2624/2021-22 दि.03/02/2022 अन्वये एकूण 5 इमारतींकरीता 330KLD चा मलनिस्सारण केंद्र उभारण्यात आल्याचा दाखला.

15) विकासकाचे दि.29/03/2022 रोजीचे हमीपत्र.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

महोदय,

विषयांकित **मौजे घोडबंदर, स.क्र. 90/2पै., 90/3ब, 91/1क, 91/2, 98/2 या जागेतील इमारत प्रकार 1,2,3,4 (तळ + 23 मजले), क्लब हाऊस (तळ + 1) करीता As built भोगवटा दाखला व MLCP इमारत (तळ + 8 मजले) करीता क्षेत्र 52335.65 चौ.मी.** चे बांधकाम **वास्तुविशारद मे. प्रदिप कांबळे ॲण्ड असो., (नोंदणी क्र. पत्र क्र. CA/87/10471 दि.31/12/2030 पर्यंतची मुदतवाढ)** यांनी सादर केलेल्या मंजूर नकाशाप्रमाणे व वास्तुविशारद मे. प्रदिप कांबळे ॲण्ड असो., यांच्या देखरेखीखाली पुर्ण झालेले असून संदरचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असल्याबाबत संरचना अभियंता मे. **गोकानी कन्सलटंटट (श्री. वत्सल गोकाणी)** व सदर इमारतीच्या प्लंबींगचे काम योग्य झालेबाबत परवानाधारक **मे. सफायर कंनस्ट्रक्शन कंपनी इंजिनियर ॲण्ड कॉन्ट्रक्टर** यांनी दाखला दिलेला आहे. यास्तव सदर **वरीलप्रमाणे** च्या **रहिवास + वाणिज्य वापराच्या इमारतीकरीता** खालील अटीशर्तींच्या अधिन राहुन इमारतीसाठी As Built भोगवटा दाखला देण्यात येत आहे.

अटीशर्ती -

1) संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वयेच्या सुधारीत बांधकाम परवानगी मधील अटीशर्तींचे व विकासकाच्या संदर्भ क्र. 14 अन्वयेच्या हमीपत्र / शपथपत्राचे पालन करणे बंधनकारक राहिल.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पू.)
जि. ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, • E-mail Id : tp@mbmc.gov.in

लोकसेवा हक्क कायदा
Right to Public Service Act
आपली सेवा आमचे कर्तव्य

O.C. (Legal) 2022-01

जा.क्र :- मनपा/नर/3881 2022 - 2023 दिनांक :- 29/8/2022

जर

अ) आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आवश्यकता वाटल्यास कोणत्याही प्रकारची पुर्तता करणेस कळविल्यानंतर किंवा कोणताही प्रकारचा प्रतिबंध केल्यानंतर त्याचे पालन नाही केल्यास.

ब) आपण कोणत्याही प्रकारची माहिती लपवून किंवा चुकीची माहिती सादर करुन परवानगी / भोगवटा दाखला प्राप्त करुन घेतल्याचे आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झालेनंतर सदरचा दाखला रद्द करणेचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

2) सदर इमारतीच्या बांधकामामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारचे फेरबदल करावयाचे झाल्यास त्याबाबत महानगरपालिकेची परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

3) सदरच्या दाखल्यामध्ये नमुद केलेल्या वापरा व्यतिरिक्त भविष्यात बदल केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा दाखला रद्द समजणेत येवून पुढील कार्यवाही करणेत येईल.

4) सदरच्या दाखल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कोणत्याही तरतुदी अन्वयेच्या कार्यवाहीसाठी बाधा येणार नाही.

5) सदरच्या दाखल्यामुळे अर्जदारास त्यांच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही जमिनीचा कोणत्याही प्रकारे वापर करता येणार नाही.

6) सदर जागेच्या मालकीबाबतच्या मा. न्यायालयात सुरु असल्यास मा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील. त्याबाबत महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

7) अर्जदारांनी सादर केलेल्या दि.04/03/2022 रोजीच्या शपथपत्राप्रमाणे मल:निस्सारण व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था, /पाणीपुरवठा व्यवस्थाबाबत देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल.

8) सदर इमारतीचा वापर सुरु करणेपुर्वी सदर दाखला वेळी सादर केलेल्या सर्व विभागाकडील नाहरकत दाखला / प्रमाणपत्र / परवानगी यामधील अटीशर्तीची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.

9) संदर्भिय पत्र क्र. 15 मधील हमीपत्रांचे / शपथपत्राचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहिल.

10) रेखांकनामधील वाहनतळाची जागा कायमस्वरुपी सार्वजनिक वापरासाठी खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

(मा. आयुक्त सो यांचे मान्यतेने..)

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर

(हे. रा. ठाकूर)
सहाय्यक संचालक, नगररचना
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत - 1) कर संकलक व निर्धारक

2) विभाग प्रमुख, अतिक्रमण तथा अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग

क्र. २